**<u>ठळक बातम्या</u>**

- स्वच्छतेसाठी एक तारीख एक तास एक साथ मोहिमेत देशभरात नागरिकांचा उत्सफूर्त सहभाग / महाराष्ट्रात ७२ हजारापेक्षा जास्त ठिकाणी स्वच्छता मोहीम

- मालदीवमधे राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत विरोधी पीपीएम पीएनसी युतीचे डॉ मोहम्मद मुइझ्झू विजयी

- तामिळनाडूत कुन्नूर इथं झालेल्या बस अपघातात ८ जणांचा मृत्यू, ४२ जखमी / अपघातग्रस्तांना प्रधानमंत्र्यांकडून मदत जाहीर

- गोवा आणि कोकण किनारपट्टीला चक्रीवादळाचा धोका टळला /कोकण, कोल्हापूर आणि साताऱ्यात हवामान विभागाकडून ऑरेंज अलर्ट जारी

**आणि**

- आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला आज एक सुवर्णपदक आणि दोन रौप्य पदकांची कमाई / ४१ पदकांसह पदकतालिकेत चौथ्या स्थानावर कायम

**<><><><><><>**

प्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार आज देशभरात नागरिकांनी स्वच्छता मोहिमेत मोठ्या संख्येनं भाग घेतला. महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहण्यासाठी आज सकाळी १० वाजता स्वच्छता मोहिमेसाठी एक तास श्रमदान करण्याचं आवाहन मोदी यांनी नागरिकांना केलं होतं.

बाजारपेठा, रेल्वे मार्ग, जलाशय, पर्यटन स्थळं, प्रार्थनास्थळं यासह सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता उपक्रमात सर्व स्तरातले नागरिक सहभागी झाले.

नवी दिल्ली इथं भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा, केंद्रीय मंत्री मीनाक्षी लेखी आणि इतर नेते स्वच्छता अभियानात सहभागी झाले होते.

या स्वच्छता मोहिमेअंतर्गत देभरातून, शहरी आणि ग्रामीण भागातली ६ लाख ४० हजारांपेक्षा जास्त ठिकाणं श्रमदानासाठी दत्तक घेतली गेली. सुमारे एक लाख निवासी भागांमधे स्वयंसेवक म्हणून मोठ्या संख्येनं रहिवासी कल्याणकारी संघटना श्रमदानासाठी पुढे आल्या. देशभरातली सुमारे ३५ हजार अंगणवाडी केंद्रं दत्तक घेण्यासाठी ग्रामीण भागातले समूह पुढं आले. या अभिनव उपक्रमात भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या जवानांनीही नागरिकांच्या साथीनं विविध ठिकाणांची स्वच्छता केली आहे.

<><><><><><>

महाराष्ट्रात, राज्यभर नागरिकांच्या श्रमदानाने स्वच्छता मोहीम राबवली गेली. नगरविकास विभागानं या मोहिमेचे आयोजन केलं.

मुंबईत आज गिरगाव चौपाटीवर उत्साही नागरिक, विद्यार्थी यांच्या जोडीनं, राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मान्यवरांनी स्वत: हातात झाडू घेऊन श्रमदान केलं, आणि स्वच्छतेसाठी “एक तारीख एक तास” या राज्यस्तरीय मोहिमेची सुरुवात केली. सुंदर महाराष्ट्र, सुंदर भारत बनवण्यासाठी आपण टाकलेलं हे मोठं पाऊल असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यामुळे आज स्वच्छतेची ही लोक चळवळ झाली आहे, असं यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बातमीदारांशी बोलतांना म्हणाले. राज्यात शहरी आणि ग्रामीण मिळून ७२ हजारापेक्षा जास्त ठिकाणी स्वच्छतेची ही मोहीम पार पडली असून, त्याबद्धल मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले. स्वच्छता हा काही केवळ एक दिवस, आणि कुणीतरी एकानंच राबवण्याचा

कार्यक्रम नाही, तर ती नेहमीसाठीची आपली जीवनशैली असली पाहिजे, असं ते म्हणाले….

**होल्ड - बाईट - मुख्य़मंत्री**

**<><><><><>**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी स्वछता मोहिमेबद्दल कौशल्य विकास विभागाचं कौतुक केलं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या 350 व्या वर्षानिमित्त राज्यातल्या 350 किल्ल्यांच्या स्वच्छतेला आजपासून सुरुवात झाली असून आयटीआयचे दीड लाख विद्यार्थी यात सहभागी होत आहेत, ही आनंदाची बाब आहे, असं फडनवीस म्हणाले.

स्वच्छता अभियानांतर्गत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला अभिवादन करून बारामती शहरात नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांसह स्वच्छता मोहिमेत भाग घेतला.

**<><><><><>**

मालदीवमधे राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत विरोधी पीपीएम पीएनसी युतीचे डॉ मोहम्मद मुइझ्झू यांनी विजय मिळवला आहे.  काल स्थानिक वेळेनुसार सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत ५७० हून अधिक मतदान केंद्रांवर मतदान झालं. पहिल्या फेरीत ७८टक्के, तर दुसऱ्या फेरीत ८६ टक्के मतदान झालं.

मालदीवमधल्या विविध प्रसारमाध्यमांनी कालच्या निवडणुकीच्या मतांची गोळाबेरीज करुन दिलेल्या निकालांमध्ये मोहम्मद मुइझ्झू यांना 53 टक्क्यापेक्षा जास्त मतं मिळाली आहेत. सत्ताधारी MDP चे इब्राहिम मोहम्मद सोलिह यांना पहिल्या फेरीत ३९ टक्के मतं, होती, ती नंतर ४६ टक्क्यापर्यंत वाढली, पण जिंकण्यासाठी आवश्यक 50 टक्क्याची मजल त्यांना मारता आली नाही. त्यांच्या

कारकिर्दीत मानवी हक्कांचे उल्लंघन होत असल्याबाबत प्रचंड संताप व्यक्त केला जात होता. सोलिह यांनी डॉ. मुइझ्झू यांचे अभिनंदन केलं असून मालदीवच्या जनतेचे आभार मानले आहेत.

डॉ. मुइझ्झू यांनी, त्यांना मतदान करणाऱ्या सर्वांचे आभार मानले आहेत. भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली 11 वर्षांची शिक्षा भोगत असलेल्या अब्दुल्ला यामीन यांना मुक्त करण्याचं सूतोवाच त्यांनी केलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी डॉ. मोहम्मद मुइझ्झू यांचं अभिनंदन केलं आहे. काळाच्या कसोटीवर उतरलेले भारत- मालदीव द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यासाठी आणि या हिंदी महासागर भागातलं सहकार्य वाढवण्यासाठी भारत कटीबद्ध आहे, असंही मोदी यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमधे म्हटलं आहे.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कुन्नूर बस दुर्घटनेतल्या प्रत्येक मृताच्या नातेवाईकांना दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. तर या अपघातातल्या जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये देण्यात येणार आहेत. तामिळनाडूतल्या निलगिरीस इथल्या कुन्नूरजवळ झालेल्या अपघातामुळे झालेल्या जीवितहानीमुळे आपण दु:खी असल्याचं मोदी म्हणाले. जखमींना लवकर बरे वाटो, अशी प्रार्थनाही त्यांनी केली.

तामिळनाडूमध्ये काल कुन्नूर निलगिरीस इथं पर्यटक बस दरीत कोसळून आठ जण ठार तर ४२ जखमी झाले. टेंकासीहून ६० प्रवाशांना घेऊन उटीहून परतत असलेल्या बसला अपघात झाला. जखमींना उटी आणि कोईम्बतूर इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><><>**

अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यानं काल रात्री साडे ८ ते साडे १० दरम्यान पणजी आणि रत्नागिरी दरम्यानची किनारपट्टी पार केली. हा कमी दाबाचा पट्टा येत्या २४ तासात आणखी कमकुवत होऊन ईशान्येकडे जाण्याची शक्यता आहे. त्यामुळं कोकण आणि गोवा किनारपट्टीचा चक्रीवादळाचा धोका टळला आहे.

हवामान विभागानं आज रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि साताऱ्यात ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या जिल्ह्यांमध्ये वीजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातले काही जिल्हे वगळता राज्यातल्या इतर भागातही जोरदार पावसाची शक्यता आहे.

**<><><><><><>**

चीनमधे हँगझोऊ इथं सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत आज आठव्या दिवशी भारतानं आणखी एक सुवर्णपदक आणि दोन रौप्य पदकांची कमाई केली. नेमबाजीत पुरुषांचा सांघिक ट्रॅप प्रकारात किनार दार्यस, जोरावर सिंग संधू आणि पृथ्वीराज तोंडायमन यांच्या संघानं ३६१ अंकांची कमाई करत सुवर्णपदक पटकावलं वैयक्तिक पात्रता फेरीत या तिघांनीही अंतिम फेरीत धडक मारली आहे.

महिलांच्या ट्रॅप प्रकारात मनीषा कीर, प्रीती रजत आणि राजेश्वरी कुमारी यांना भारताला रौप्य पदक मिळवून दिलं. त्यांच्यापैकी फक्त कीर अंतिम फेरीसाठी पात्र ठरली.

महिलांच्या वैयक्तिक गोल्फ स्पर्धेत अदिती अशोकनं रौप्यपदक पटकावलं. या स्पर्धेत भारतानं आतापर्यंत, ११ सुवर्ण, १६ रौप्य आणि १४ कांस्य पदकांसह

एकूण ४१ पदकांची कमाई केली आहे. पदकतालिकेत भारत सध्या चौथ्या स्थानावर आहे

<><><><><><>

स्लोव्हाकियाच्या संसदीय निवडणुकीत माजी प्रधानमंत्री रॉबर्ट फिको यांच्या नेतृत्वाखालच्या **Smer-SSD** या रशियावादी पक्षानं विजय मिळवला आहे. निवडणूकपूर्व अंदाजांमधे उदारमतवादी मध्यममार्गी पक्षाला विजय मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. मात्र हा अंदाज फोल ठरवत Smer-SSD पक्षानं सुमारे २४ टक्के मतांसह आघाडी घेतली. उदारमतवादी प्रोग्रेसिव्ह स्लोव्हाकिया पक्षाला सुमारे 17 टक्के मतदान झालं. स्मेर यांनी युक्रेनला लष्करी मदत त्वरित बंद करण्याचं आश्वासन दिलं आहे.

<><><><><><>

युक्रेनमध्ये युद्ध करून रशिया आपल्या सार्वभौमत्व आणि आध्यात्मिक मूल्यांच रक्षण करत असल्याचं रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी क्रेमलिन वेबसाइटवर पोस्ट केलेल्या व्हिडिओ संबोधनात म्हटलं आहे.

रशियाला जोडलेल्या प्रदेशांचा विकास करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम राबवावा लागेल. या प्रदेशांची जोडणी पूर्णतः आंतरराष्ट्रीय नियमांनुसार केली आहे, असं पुतीन म्हणाले.

//<><><><><><>//